नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

दिनांक १५/१२/२०२५ (सोमवार )

# मा. पोलीस अधिक्षक, नागपुर ग्रामीण जिल्हा यांनी पोलीस स्टेशन नरखेड आणि कोंढाळी हद्दीतील मतदान केंद्रांना दिली भेट

नागपुर ग्रामीण जिल्हयात दिनांक २०/१२/२०२५ रोजी नगर परिषद नरखेड, नगर परीषद रामटेक आणि नगर पंचायत कोंढाळी येथे सार्वत्रिक निवडणूक असुन त्या अनुषंगाने आज दिनांक १५/१२/२०२५ रोजी मा. श्री. हर्ष  ए. पोद्दार, पोलीस अधिक्षक, नागपुर ग्रामीण जिल्हा यांनी पोलीस स्टेशन नरखेड आणि कोंढाळी हद्दीतील मतदान केंद्रांना भेट दिली. मा पोलीस अधिक्षकांनी स्वत: मतदान केंद्रांची पाहणी करून मतदान केंद्रांवर सुरक्षेच्या उपाययोजना तपासून घेतल्या. संबधीतांना महत्त्वाच्या सुचना दिल्या. सदरवेळी श्री पराग पोटे,उपविभागिय पोलीस अधिकारी, काटोल, पोलीस निरीक्षक श्री प्रमोद घोंगे, प्रभारी अधिकारी , जिल्हा विशेष शाखा, ना.ग्रा. , सहा पोलीस निरीक्षक श्री अजित कदम, प्रभारी अधिकारी नरखेड, सहा पोलीस निरीक्षक श्री राजकुमार त्रिपाठी, प्रभारी अधिकारी कोंढाळी हे  हजर होते.


अतिथी देवो भव
स्वागतम्


(C.B.S.E.)
FORCE

# घरफोडीचा गुन्हा उघड, २ आरोपी अटक
# सावनेर पोलीसांची कामगिरी

**पोलीस स्टेशन सावनेर :—** फिर्यादी नामे श्रीमती राधाबाई चक्रधर आवते,रा. यशवंत बाबा, झोपडपट्टी सावनेर यांनी पोलीस स्टेशन सावनेर येथे रिपोर्ट दिली की, दिनांक २५/११/२०२५ चे रात्री २२/०० वा. ते २६/११/२०२५ चे पहाटे ०५/०० वा. दरम्यान अज्ञात चोरटयानी फिर्यादीचे राहते घराच्या दरवाजा तोडुन घरातुन रोख रक्कमेसह सोन्या चांदीचे दागिने असा एकुण ३,६५,०००/—रूपयांचा मुद्देमाल चोरी केला. फिर्यादीचे तोंडी रिपोर्ट वरून कलम ३०५(अ),३३१(४),३(५) भा.न्या.स. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला .

मा. श्री हर्ष ए. पोद्दार, पोलीस अधिक्षक, नागपुर ग्रामीण जिल्हा आणि श्री अनिल म्हस्के, अपर पोलीस पोलीस अधिक्षक, नागपुर ग्रामीण यांच्या मार्गदर्शनात सावनेर पोलीसांनी गुप्तबातमीदारांच्या माहीतीच्या अधारे दिनांक ३०/११/२०२५ रोजी **आरोपी क्रं १ शेख अश्पाक शेख मुस्ताक, वय ४३ वर्षे, रा. आजाद कॉलंनी, बडा ताजबाग** यास नागपुर येथुन ताब्यात घेवुन अटक केले. नमुद आरोपीकडे पोलीसांनी सखोल आणि कौशल्यपुर्ण विचारपुस केली असता त्याने **त्याचा साथीदार आरोपी क्रं २ शाम उर्फ काल्या रामाजी पुंड,वय ३० वर्ष,रा. महालक्ष्मी नगर, गल्ली क्रं ३, वांजरा रोड ,कळमना, ह.मू इंदिरा माता नगर, बिनाकी, मंगळवारी, यशोधरा, नागपूर आणि एक विधीसंघर्ष ग्रस्त बालक यांच्यासह मिळुन सदर घरफोडीचा गुन्हा केल्याची कबुली दिली**. दिनांक ११/१२/२०२५ रोजी आरोपी क्रं २ शाम उर्फ काल्या रामाजी पुंड याला अटक करण्यात आली. सावनेर पोलीसांनी नमुद आरोपीतांकडुन गुन्हयातील चोरीस गेलाला मुद्देमाल जप्त केला आहे.



# अवैधरित्या रेतीची चोरटी वाहतुक करणाऱ्यावर गुन्हा नोंद आरोपी अटक,मौदा पोलीसांची कामगिरी

**पोलीस स्टेशन मौदा :—** दिनांक १४/१२/२०२५ रोजी मौदा पोलीसांना गुप्त बातमीदारांकडुन खात्रीशीर माहीती मिळाली की, अवैधरित्या विनापरवाना रेतीची चोरटी वाहतुक केली जात आहे. मिळालेल्या माहीतीच्या आधारे पोलीसांनी मौजा माथनी टोल नाका येथे नाकाबंदी केली असता संशयीत वाहन ट्रक क्रमांक एम एच ४०सी एम ९५९९ मिळुन आला. वाहन थांबवुन वाहनाची पाहणी केली असता त्यामध्ये रेती आढळुन आली. वाहन चालकाला नाव पत्ता विचारला असता, **मोहम्मद शाबीर वल्द मोहम्म्द रफीक, वय ४० वर्ष, रा. डीएड कॉलेज जवळ अमरावती** असे असुन सदर वाहन त्याचेच मालकीचे असल्याबाबत त्याने माहीती दिली. त्याला परवान्याबाबत विचारणा केली असता त्याने कोणताही परवाना नसल्याबाबत सांगितले. **पोलीसांनी पंचासमक्ष १) ट्रक क्रमांक एम एच ४०सी एम ९५९९ आणि १० ब्रास रेती असा एकुण ३५,५०,०००/—रूपयांचा मुददेमाल जप्त केला आहे.**

सदर प्रकरणी वाहन आरोपीविरूध्द पोस्टे मौदा येथे कलम ३०३(२) भा.न्या.सं, सहकलम ४८(७), ४८(८) महाराष्ट्र जमिन महसुल संहीता, कलम ४, १२ खाण खनिज अधिनियम, कलम ३ सा.सं.नु.प्र.अ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.आरोपीला अटक करण्यात आली आहे.



## मंदीरात चोरी करणारा आरोपी निष्पन्न
## पारशिवणी पोलीसांची कामगिरी

**पोलीस स्टेशन पारशिवणी :—** फिर्यादी नामे प्रशांत देविदास गुडधे वय ४८वर्ष, व्यवसाय शेती, रा. खंडाळा (मरियंबी), ता. पारशिवनी जि. नागपूर, यांनी पोलीस स्टेशन पारशिवणी येथे रिपोर्ट दिली की, ०२/११/२५ चे ११/३० वा ते १२/१५वा दरम्यान अज्ञात चोरटयानी फिर्यादीचे शेतातील संतोषी मातेच्या मंदीराचे समोरील चँनल गेटचे व गर्भगृहातील लाकडी दरवाज्याचे कुलुप तोडुन मंदिराचे आत प्रवेश करुन देवीचा चांदीचा मुकुट आणि सोन्याचे दागिने असा एकूण ४८,७००/— रुपयांचा मुद्देमाल चोरी केला. फिर्यादीचे तोंडी रिपोर्ट वरून कलम ३०५(अ),३३१(४),३(५) भा.न्या.स. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला .

मा. श्री हर्ष ए. पोद्दार, पोलीस अधिक्षक, नागपुर ग्रामीण जिल्हा आणि श्री अनिल म्हस्के, अपर पोलीस पोलीस अधिक्षक, नागपुर ग्रामीण यांच्या मार्गदर्शनात पारशिवणी पोलीसांनी तांत्रिक पुरावे आणि गुप्तबातमीदारांच्या माहीतीच्या अधारे दिनांक १०/११/२०२५ रोजी आरोपी नामे रामकृष्ण हरेश्वर मोहुर्ले, वय ६५ वर्षे, प्लॉट क्रं ६६,लालगंज गुजरी चौक, नागपुर ह.मु बिनासंगम, ता. कामठी जि नागपुर याला बिनासंगम ता कामठी येथुन ताब्यात घेवुन नमुद आरोपीकडे पोलीसांनी सखोल आणि कौशल्यपुर्ण विचारपुस केली असता त्याने गुन्हा केल्याची कबुली दिली. नमुद आरोपीकडुन देवीचा चांदीचा मुकुट आणि सोन्याचे दागिने आणि गुन्हयात वापरलेले वाहन स्कुटर क्रं एम एच ३१ वाय ९०५४ असा एकुण ४८,७०० /— रूपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.

## बेला पोलीसांची अवैध धदयांवर कारवाई
## अवैधरित्या दारू विक्री करणाऱ्या ५ गुन्हे, सट्टपट्टी चालविणाऱ्यांवर ४ गुन्हे नोंद

**पोलीस स्टेशन बेला :—** दिनांक १५/१२/२०२५ रोजी बेला पोलीस अवैध धंदयावर कारवाई कामी पेट्रोलींग करीत असतांना गुप्त बातमीदाराकडुन खात्रीशीर माहीती वरून मौजा बेला, सिर्सी, आणि पिपरा येथे अवैध धंदयावर कारवाई करण्यात आली. अवैध दारू विक्रेत्यांवर

कारवाई करत आरोपी नामे **१. मोरेश्वर नारायन पराते ,रा. सिर्सि , २ रमेश नामदेव निमजे, रा बेला, ३. दिनेश घनश्याम चौरे, रा. पिपरा, ४. नितीन भिमराव बडीये,रा. पिपरा, ५. प्रफुल धर्मकांत कवाडे, रा. पिपरा,** यांच्यावर मदाका अन्वये ५ गुन्हे दाखल करण्यात आले. नमुद आरोपीतांकडुन एकुण २,७२०/— रूपयांचा मुद्देमाल मिळून आला. आरोपीविरुद्ध महाराष्ट्र दारूबंदी अधिनियमान्वये ४ गुन्हे नोंदविण्यात आला आहे.तसेच **१.रूपेश शंकर बारापात्रे, रा. बेला, २. नरेंद्र देवनारायन सोरते, रा. सिर्सि,३.अमोल हरीभाउ नौकरकर,रा पिपरा ,४. नरेश जित्रुजी सोरते, रा.पिपरा हे वरली मटका चालवितांना मिळुन आल्याने आरोपीतांकडुन एकुण १३२०/— रूपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. नमुद** आरोपीविरुद्ध मजुका अन्वये ४ गुन्हे नोंदविण्यात आले आहे.

## अवैधरित्या ५२ ताशपत्त्यांचा जुगार खेळणाऱ्या ६ आरोपीतांविरूध्द गुन्हा नोंद. भिवापूर पोलीसांची कामगिरी

**पोलीस स्टेशन भिवापूर** :— दिनांक १४/१२/२०२५ रोजी भिवापूर पोलीसांना गुप्तबातमीदारा मार्फत खात्रीशीर माहीती मिळाली की, मौजा भिवापूर टाउन, खातीपुरा रोड, येथे शेताजवळ काही इसम ५२ ताशपत्त्यांचा जुगार खेळत आहे. मिळालेल्या माहीतीच्या आधारे पोलीस घटनास्थळी पोहचुन धाड टाकली असता **आरोपी नामे १) अजय बिसन वाघमारे, वय ३६ वर्ष, रा. कुंभार मोहल्ला, भिवापूर २) विष्णु दौलत दुधपचारे, वय ३१ वर्ष, रा.आझाद चौक, भिवापूर ३) अमोल किसन नागपूरे, वय २७ वर्ष, रा. गुरूदेव वार्ड भिवापूर ४)अनिल नामदेव नागरिकर, वय ४७ वर्ष, रा. गुरूदेव वार्ड भिवापूर ५) सुनिल प्रभाकर नागपूरे, वय ४४ वर्ष, रा. गुरूदेव वार्ड भिवापूर ६) किशोर प्रल्हाद प्रिपळकर, वय ३० वर्ष, रा. गुरूदेव वार्ड भिवापूर** हे ५२ ताशपत्त्यांचा जुगार खेळतांना जागीच मिळुन आले. आरोपीतांच्या ताब्यातुन ५२ ताशपत्ते व नगदी २१९०/— रूपयाचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.

**नमुद आरोपी क्र. १ ते ६ यांच्या विरूद्ध कलम १२ (अ) मजुका अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला आहे.**

## पोलीस ठाणे केळवद हद्दीतील मौजा तिडंगी येथे अवैधरित्या मोहाफुल दारू विक्री काढणाऱ्या आरोपीतांवर गुन्हा नोंद आरोपी अटक

**पोलीस स्टेशन केळवद** :— दिनांक १५/१२/२०२५ रोजी केळवद पोलीसांना गुप्त बातमीदाराकडुन खात्रीशीर माहीती प्राप्त झाली की, मौजा तिडंगी येथे आरोपी नामे सुर्या राजपुत, रा तिडंगी, ता. कळमेश्वर हा अवैधरित्या गावठी मोहाफुल दारूची विक्री करीत आहे. अशी माहीती प्राप्त होताच पोलीसांनी नमुद ठिकाणी जावुन धाड टाकुन आरोपी नामे सुर्या राजपुत, रा तिडंगी, ता. कळमेश्वर आणि त्याची पत्नी यांच्यावर वर कारवाई करत १) १५ लिटर मोहाफुल दारू, असा एकुण १५००/— रूपयांचा मुद्देमाल जप्त केला. आरोपीविरुद्ध कलम महाराष्ट्र दारूबंदी अधिनियमान्वये गुन्हा नोंदविण्यात आला आहे. आरोपीला अटक करण्यात आली आहे.

## अवैधरित्या विनापरवाना दारू काढणारे, दारू बाळगुण विक्री करणाऱ्या आरोपीतांविरूद्ध ०७ गुन्हे नोंद

दिनांक १४/१२/२०२५ रोजी दारूबंदी कायदा अंतर्गत विविध पोलीस स्टेशनला पोलीसांनी अवैधरित्या दारू बाळगुन विक्री करणाऱ्यांवर छापा टाकुन देशी दारू, मोहाफुल दारू असा एकुण ४१९०/— रूपयांचा मुद्देमाल जप्त केला. महाराष्ट्र दारुबंदी अधिनियम अन्वये एकुण ०७ गुन्हे दाखल करण्यात आले आहे.

पोलीस स्टेशन भिवापूर येथे १ गुन्हा नोंद आहे. पोलीस स्टेशन रामटेक येथे ०३ गुन्हे नोंद आहे. पोलीस स्टेशन खापा येथे १ गुन्हा नोंद आहे. पोलीस स्टेशन बुट्टीबोरी येथे १ गुन्हा नोंद आहे. पोलीस स्टेशन बेला येथे १ गुन्हा नोंद आहे. महाराष्ट्र दारू बंदी अधिनियम अन्वये एकुण ०७ गुन्हे नोंद केले आहे.

**सदर कारवाईत ४५९० मिली देशी दारु, ३२ लीटर मोहाफुल दारू असा एकुण ४१९०/— रूपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे. नाशवंत मुद्देमाल पंचनामा कारवाई करून नष्ट करण्यात आला आहे.**

मा. पोलीस अधिक्षक
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर
यांच्या मान्यतेने